# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 10 January 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १० जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०

****

- परदेशातील भारतीय नागरीक केवळ ज्ञानच नाही तर देशाच्या मुल्यांचं प्रतिनिधीत्व करतात, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रवासी दिनाच्या समारोपात प्रतिपादन
- विकसित भारत घडवण्यासाठी २०४७ पर्यंत नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवणं गरजेचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पहिला पॉडकास्ट प्रसिद्ध
- केंद्र सरकारकडून राज्यांना करहस्तांतरण, महाराष्ट्राला मिळणार १० हजार ९३० कोटींचा निधी
- संतोष देशमुख हत्याप्रकरणाची मानवाधिकार आयोगाकडून दखल

आणि

- महाकुंभमेळ्याला समर्पित आकाशवाणीच्या विशेष 'कुंभवाणी' वाहिनीचं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते लोकार्पण

****

परदेशातील भारतीय नागरीक आपल्या देशातील सर्वोत्तम बाबींचं प्रतिनिधीत्व करतात. ते केवळ आपल्यासमवेत ज्ञान आणि कौशल्यच नाही तर आपली मूल्यंही सोबत बाळगतात, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज ओडिशातील भुवनेश्वर इथं १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या समारोप सत्राला संबोधित करत होत्या. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या परदेशी भारतीयांना राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान यावेळी प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती मुर्मु यांनी ओडीशातील पारंपारिक हस्तकलांच्या प्रदर्शनाला यावेळी भेट दिली.

****

विकसित भारत घडवण्यासाठी २०४७ पर्यंत नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवल्या पाहिजे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. उद्योजक निखिल कामथ यांनी आज पॉडकास्टसाठी घेतलेल्या मुलाखतीत पंतप्रधान बोलत होते. सरकारी योजनांची १०० टक्के अंमलबजावणी झाली पाहिजे, असं सांगून या योजना सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेचं एक रूप असल्याचं म्हटलं आहे. राजकारणात यशस्वी होण्यासाठी समर्पण, वचनबद्धता, नेतृत्व आणि जनतेसाठी कायम उपलब्ध असणं आवश्यक आहे. चांगल्या लोकांनी केवळ महत्त्वाकांक्षा न बाळगता एका ध्येयाने राजकारणात प्रवेश करावा असं आवाहन मोदी यांनी केलं. या पॉडकास्टमध्ये पंतप्रधानांनी त्यांचा जीवन प्रवास, शिक्षण, राजकीय कारकीर्द, व्यवस्थापन कौशल्ये आणि इतर विषयांवर चर्चा केली.

***पहली टर्म मे तो लोग मुझे भी समझने की कोशिश करते थे। और मै भी दिल्ली को समझने की कोशिश कर रहा था। पहले और दुसरे टर्म मे मै बीते हुये कल के संदर्भ मे सोचता था। तिसरे टर्म मे मेरी सोच का दायरा बदल चुका है। मेरा हौसला ज्यादा बुलंद हो चुका है। मेरे सपनों का विस्तार हो चुका है। मेरे अरमान बढते चले जा रहे है। कहने का तात्पर्य है की, मुझे 2047 विकसित भारत मतलब की भाषण नही है ये। टॉयलेट 100% हो जान चाहीये। बिजली 100% होने जा रही है। नल से जल 100% हो जाना चाहीये। सामान्य मानवी को 100% डेलिवरी होनी चाहीये।***

****

केंद्र शासनाकडून सर्व राज्यांना आज एक कोटी ७३ लाख ३० हजार कोटी रुपयांचं कर हस्तांतरण जारी करण्यात आलं. यात महाराष्ट्र राज्याचा १० हजार ९३० कोटी ३१ लाख रूपयांचा वाटा आहे. भांडवली खर्चाला गती देण्यासाठी आणि विकास आणि कल्याणाशी संबंधित खर्चांना वित्तपुरवठा करण्यासाठी केंद्र शासनानं कर हस्तांतरण केले आहे. चालू भांडवली खर्चाला गती देण्यासाठी, तसंच विकास आणि कल्याणाशी संबंधित खर्चाला वित्तपुरवठा करण्यात राज्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने अधिक रक्कम हस्तांतरित केली जात असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे याबद्दल आभार मानले आहेत. राज्याच्या विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांना यामुळं पाठबळ मिळणार असल्याचं फडणवीस यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

****

सुसंस्कृत पिढी घडवण्यासाठी विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केलं. लातूर इथं आज तीन दिवसीय मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनाचं उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. समाजाच्या प्रगतीसाठी सहकार आणि शिक्षण या दोन अतिशय महत्वपूर्ण बाबी असल्याचं त्यांनी सांगितलं. सहकाराच्या माध्यमातून सर्वांगीण प्रगती साधणे शक्य आहे. त्याचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळावा यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

****

बीड इथले मस्सोजागचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा राष्ट्रीय मानवाधिकार आयोगात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांनी आयोगाकडे मागणी केली होती. आयोगामार्फत याप्रकरणाची चौकशी करून राज्य सरकारकडून अहवाल मागवण्यात येणार असल्याचं सोनवणे यांनी सांगितलं.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणासंदर्भात सरकारची भूमिका संशयास्पद असल्याची टीका विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

> ***याच्यातला एक आरोपी अजून सापडत नाहीये. जो आरोपी मुख्य त्याच्यावर 302 गुन्हा दाखल होत नाहीये. संबंधित मंत्र्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई सरकार करत नाहीये. सरकार मला असं वाटतं, गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचंच काम करतंय का? एकीकडे दाखवतंय सरकार आम्ही आरोपींना पकडतोय, तर आरोपी पकडले गेले नाही, आरोपी आले सरेंडर झाले. त्यामुळे सरकारच्या या भूमिकेविषयी साशंकता निर्माण झालेली आहे.***

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, तसंच या प्रकरणातल्या दोषींना फाशीची शिक्षा द्यावी यासह अन्य मागण्यांसाठी आज जालना इथं मराठा क्रांती मोर्चाच्या वतीनं आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानाची सुरूवात करण्यात आली. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, महामार्ग सुरक्षा पथकाच्या पोलीस अधीक्षक रुपाली दरेकर, यांच्यासह इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते. सुरक्षा केवळ रस्त्यावरच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आवश्यक असल्याचं सांगत समन्वय, सतर्कता आणि संयम यामुळे जीवन सुरक्षित होते असं स्वामी यावेळी बोलताना म्हणाले. प्रत्येक व्यक्तीनं अपघात कमी करण्याचा संकल्प करण्याचं आवाहन स्वामी यांनी यावेळी केलं.

****

मोटर वाहन कायद्याच्या नियमांचं पालन करणं हीच वाहन चालक आणि वाहकाची खरी जबाबदारी असल्याचं प्रतिपादन विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सोनी यांनी केलं. बीड इथं पोलीस अधीक्षक कार्यालयात रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी मोटर वाहन कायदा आणि नियम या विषयांवर मार्गदर्शन केलं.

****

महाकुंभ २०२५ ला समर्पित आकाशवाणीच्या विशेष 'कुंभवाणी' वाहिनीचं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते आज लोकार्पण झालं. प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. महाकुंभ जात, पंथ आणि भेदभावाच्या पलिकडे असून, एकतेचा संदेश देत असल्याचं योगी आदित्यनाथ यावेळी म्हणाले. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कुंभवाणी या वाहिनीवर आजपासून २६ फेब्रुवारीपर्यंत महाकुंभमेळ्यात होणाऱ्या अमृतस्नानासह सर्व कार्यक्रमांचं थेट प्रसारण केलं जाईल. आकाशवाणीच्या १०३ मेगाहर्टझ लहरींवरून, 'न्यूज ऑन ए आय आर' ॲप वरून, तसंच 'वेव्ज' या ओ टी टी मंचावरून कुंभवाणीचं प्रसारण ऐकता येईल.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या वतीनं तीन दिवसीय सिद्धा महोत्सव भरवण्यात येत आहे. मकर संक्रांती सणाच्या निमित्ताने लागणाऱ्या साहित्याची विक्री या महोत्सवात केली जाणार आहे. यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान अंतर्गत उमेद स्वयंसहायता समूहातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे स्टॉल उभारण्यात येणार आहेत. उद्या पासून सुरू होणाऱ्या महोत्सवाचे उद्घाटन खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते होणार आहे. सोमवार पर्यंत हा महोत्सव जिल्हा परिषद मैदानावर सुरू राहणार आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे यांनी दिली.

***७५ स्वयं सहाय्यता समूह सहभागी असणार आहे. या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन सुध्दा दररोज करण्यात येणार आहे. बचत गटाच्या खाद्य पदार्थाचे जे स्टॉल असणार आहेत, त्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्यावा. आणि या प्रदर्शना मध्ये खरेदी करून या महिला बचत गटातील सदस्यांना प्रोत्साहीत करावं, त्यांचं मनोबल वाढवावं आणि त्यांचा अर्थिक स्तर उंचावा म्हणून हातभार लावावा असं आवाहन मी सर्वांना करत आहे.***

****

शाकंभरी नवरात्र महोत्सवात आज चौथ्या माळेला तुळजाभवानी देवीची शेषशायी अलंकार महापूजा मांडण्यात आली. यासंदर्भातल्या आख्यायिकेनुसार, भगवान विष्णू शेषशैय्ये वरती विश्राम करत असताना मातेने त्यांच्या नेत्रकमळात विश्राम घेतला यावेळी भगवान विष्णू यांच्या मलापासून निर्माण झालेल्या दोन दैत्यांचा अंबामातेनं वध केला.त्यानंतर विष्णूने आपली शैय्या देवीला अर्पण केली, त्यामुळे शेषशायी अलंकार पूजा मांडली जाते.

****

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघातल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतला पहीला सामना भारतानं सहा विकेटने जिंकला. आयर्लंडच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत सात बाद २३८ धावा केल्या. भारताच्या प्रतिका रावलने ८९ आणि तेजल हसबनिसने नाबाद ५३ धावांची विजयी खेळी केली. अवघ्या ३४ षटके तीन चेंडूत भारतानं २४१ धावा करत सामना जिंकला.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात पदवी घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी येत्या ७ फेब्रुवारी पर्यंत परीक्षा विभागात आवेदनपत्र दाखल करण्याचं आवाहन विद्यापीठ प्रशासनानं केलं आहे.

****